# प्रेसनोट दि. ३१/०१/२०१८

## विश्रामबाग पोलीसांची कारवाई
## एक अग्निशस्त्र व दोन मोबाईल हस्तगत

दि. ३०/०१/२०१८ रोजी विश्रामबाग पोलीस ठाणेकडील तपास पथकातील अधिकारी महेंद्र पाटील व त्यांचा तपासपथकातील पोलीस स्टाफ वरिष्ठांचे मार्गदर्शनाखाली खालील प्रमाणे कारवाई केली.

१. विधीसंघर्षीत बालक हा दि. ३०/०१/२०१८ रोजी १७.१० वा. तेंडूलकर गार्डन जवळ, पुणे येथे अग्निशस्त्रासह येणार आहे. अशी खबर विश्रामबाग पोलीस ठाणेचे पोलीस नाईक बाबा दांगडे व पोलीस शिपाई संजय बनसोडे यांना मिळाली होती. त्याप्रमाणे वरील विधीसंघर्षीत बालकास एक देशी बनावटीचा कटटा व एक काडतुस बेकायदेशीर हत्यार जवळ बाळगले असताना मिळून आल्याने त्यास ताब्यात घेवून त्याचे विरूध्द विश्रामबाग पोलीस ठाणे गुन्हा रजि. नंबर २८/२०१८ आर्म ॲक्ट कलम ३, २५ व मुंबई पोलीस ॲक्ट कलम ३७ (१) सह १३५ प्रमाणे दि. ३०/०१/२०१८ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

२. आरोपी नामे बजरंग सिध्दराम गायकवाड वय ३५ वर्षे रा. शेवटचा बसस्टॉप, केशवनगर, जांभळा प्लॉट, मुंढवा, पुणे यास मिळाले बातमीवरून ताब्यात घेवून त्याचेकडून १५,०००/- किं. चा चोरीचा मोबाईल हॅन्डसेट हस्तगत करून विश्रामबाग पोलीस ठाणे, गुन्हा रजि. नंबर २३/२०१८ भादंविक ३८० हा गुन्हा उघडकिस आणला आहे.

३. महिला आरोपी आसमा मुजाहिद सय्यद वय ३० वर्षे रा. हमीद कॉलनी, अराफत मशीद जवळ, पैठण जि. औरंगाबाद सध्या गल्ली नंबर १ स. नं. ६ अजमेरा पार्क, पुणे हिस अटक करून तिचेकडून 1+2 कंपनीचा १०,०००/- रू. किंचा मोबाईल हॅन्डसेट हस्तगत करण्यात आला आहे.

वरील कामगिरी परिमंडळ १ चे पोलीस उप-आयुक्त मा. बसवराज तेली, सहा. पोलीस आयुक्त मा. शरद उगले यांचे मार्गदर्शनाखाली विश्रामबाग पोलीस ठाणेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्रीकांत शिदे, पोलीस निरीक्षक गुन्हे अमृत मराठे पोलीस उप-निरीक्षक महेंद्र पाटील, पोलीस हवालदार वाकसे, पोलीस नाईक बाबा दांगडे, पोलीस शिपाई संजय बनसोडे, सचिन जगदाळे, चेतन शिरोळकर, महिला पोलीस शिपाई रेखा बनकर यांनी केली आहे.

गुन्हयाचा पुढिल तपास विश्रामबाग पोलीस ठाण्याकडिल पोलीस उप-निरीक्षक महेंद्र पाटील हे करीत आहेत.